19 APR 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरूडाचे दर्शन

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठ परिसरात दुर्मिळ मानल्या जाणाऱ्या पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरूड (White-bellied Sea Eagle) या भव्य पक्ष्याच्या जोडीचे दर्शन घडल्याने जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण नोंद झाली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून ही जोडी विद्यापीठ परिसरात वास्तव्यास असून त्यामुळे विद्यापीठ परिसरातील सुरक्षित आणि समृद्ध पर्यावरणावर शिक्कामोर्तब झाले आहे.

विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. सुनील गायकवाड आणि युवा पक्षीनिरीक्षक महेंद्र गायकवाड यांना फेब्रुवारी २०२६मध्ये सर्वप्रथम भाषा भवन तलाव परिसरात या जोडीचे दर्शन घडले. तेव्हापासून त्यांचे येथे नियमित वास्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी डॉ. गायकवाड यांनी केलेल्या संशोधनानुसार, विद्यापीठ परिसरात पक्ष्यांच्या १२६ प्रजातींची आढळ नोंद झालेली आहे. आता या पक्ष्याच्या दर्शनाने त्यामध्ये महत्त्वाची नोंद समाविष्ट झाली आहे.

डॉ. गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, पांढऱ्या पोटाचा समुद्री गरूड हा प्रामुख्याने समुद्रकिनारी आढळणारा पक्षी आहे. मात्र, सुरक्षित वातावरण आणि मुबलक खाद्यसंपन्नता असलेल्या अंतर्गत भूभागाकडेही तो स्थलांतर करतो. सध्या विद्यापीठ परिसरात नर व मादी अशी जोडी आढळून आली असून, जोडीने उपस्थिती असल्यामुळे त्यामागे प्रजोत्पादनाचा हेतू असण्याची



शक्यता नाकारता येत नाही. तरीदेखील, त्यांनी अद्याप या परिसरात घरटे बांधल्याचे आढळलेले नाही. त्यामुळे त्याविषयी ठोस सांगता येणार नाही.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील जलाशयांची पातळी कमी झाल्यामुळे मासे व इतर जलचर सहज उपलब्ध होत असल्याने खाद्यसंपन्नतेमुळे हे पक्षी येथे थांबले असावेत, असा अंदाज डॉ. गायकवाड यांनी व्यक्त केला. याशिवाय, समुद्रकिनाऱ्यांवरील वाढते पर्यटन प्रकल्प, बोटिंग आणि किनारपट्टीवरील प्रदूषण हीदेखील त्यांच्या स्थलांतरामागील कारणे असू शकतात, असे ते म्हणाले.

**वन्यजीव कायद्याच्या 'अनुसूची-१'मध्ये समाविष्ट पक्षी**

पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरूडाचे शास्त्रीय नाव हॅलिएटस ल्युकोगॅस्टर (Haliaeetus leucogaster) आहे. हा पक्षी आकाराने मोठा असून मादी साधारणपणे नरापेक्षा मोठी असते. याची लांबी साधारण ७० ते ९० सेंमी दरम्यान असते, तर पंख पसरल्यावर (wingspan) त्यांची रुंदी सुमारे १.८ ते २.२ मीटरपर्यंत पोहोचते. पंख मिटल्यावर त्याचा आकार भरीव व मजबूत दिसतो. या गरूडाचे सर्वात ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्याचे शुभ्र डोके, मान, छाती आणि पोट. त्याची पाठ व पंख राखाडी (slate-grey) रंगाचे असतात. शेपटी लहान व पूर्णपणे पांढरी असते. चोच मोठी, मजबूत व वाकडी असून ती करड्या-निळसर रंगाची असते. त्याची दृष्टी तीक्ष्ण असून शिकार पकडण्यासाठी त्याचे पाय व नखे अत्यंत शक्तिशाली असतात. तो प्रामुख्याने मासे, जलचर, लहान सस्तन प्राणी तसेच प्रसंगी मृत प्राण्यांवरही उपजीविका करतो. जलाशयांच्या आसपास उंच झाडांवर बसून गतीने झेप घेऊन शिकार टिपतो.

हा पक्षी वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ अंतर्गत अनुसूची-१ (Schedule-I) मध्ये समाविष्ट असून त्याला सर्वोच्च संरक्षण प्राप्त आहे. या श्रेणीत समाविष्ट पक्ष्यांची शिकार किंवा व्यापार करणे हा गंभीर गुन्हा असून, त्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद आहे, अशी माहितीही डॉ. गायकवाड यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर

19 APR 2026

सकाळ

# विद्यापीठाचा 'एक्सलॉजिया टेक एलएलपी' सोबत सामंजस्य करार

कोल्हापूर, ता. १८ : 'शिवाजी विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा समाजासह विद्यार्थ्यांना लाभ मिळवून देणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट आणि पुणे येथील 'एक्सलॉजिया टेक एलएलपी' यांच्यामध्ये विद्यापीठाने विकसित केलेल्या आभासी वास्तविकता शैक्षणिक प्रणालीतील डिजिटल ॲसेट्स आणि क्विक रिस्पॉन्स आधारित बँकिंग प्रणालीचा वापर व वितरण यासाठी सामंजस्य करार करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या.



कोल्हापूर : सामंजस्य कराराच्या प्रतीचे हस्तांतरण करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व शैलेश कोपार्डेकर. शेजारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. नितीन माळी, डॉ. सुधीर देसाई.

एक्सलॉजिया कंपनीचे शैलेश कोपर्डेकर म्हणाले, 'विद्यापीठाने विकसित केलेले नवोपक्रम आणि तंत्रज्ञान प्रत्यक्ष उद्योग-व्यवसाय क्षेत्रापर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याची बाब लक्षात घेऊन या करारासाठी पुढाकार घेतला. समाजोपयोगी विद्यापीठीय संशोधनाचा समाज व उद्योग क्षेत्राला प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी नजीकच्या काळात प्रयत्न केले जातील.'

करारावर कुलसचिव डॉ. विलास शिंदे, कोपार्डेकर यांनी स्वाक्षरी केली. डॉ. सुधीर देसाई यांनी सामंजस्य कराराविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, डॉ. परशुराम वडार, डॉ. तेजश्री मोहरेकर, डॉ. मनस्वी कोपार्डेकर, अभिजित जाधव उपस्थित होते. स्कूलचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वैशाली भोसले यांनी सूत्रसंचालन केले.

19 APR 2026

सकाळ

# विद्यापीठात पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरुडाचे दर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसरात दुर्मीळ मानल्या जाणाऱ्या पांढऱ्या पोटाच्या समुद्री गरुड या पक्षाच्या जोडीचे दर्शन घडल्याने जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण नोंद झाली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून ही जोडी विद्यापीठ परिसरात वास्तव्यास असून, त्यामुळे विद्यापीठ परिसरातील समृद्ध पर्यावरणावर शिक्कामोर्तब झाले आहे.



**समुद्री गरुडाची जोडी**

विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. सुनील गायकवाड आणि युवा पक्षी निरीक्षक महेंद्र गायकवाड यांना फेब्रुवारीमध्ये सर्वप्रथम भाषा भवन तलाव परिसरात या गरुडाच्या जोडीचे दर्शन घडले. तेव्हापासून त्यांचे येथे नियमित वास्तव्य आहे. विद्यापीठ परिसरात पक्ष्यांच्या १२६ प्रजातींची आढळ नोंद झाली आहे. आता या पक्षांच्या दर्शनाने त्यामध्ये महत्त्वाची नोंद झाली आहे.

19 APR 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लक्षवेधी

## शैक्षणिक, बँकिंग प्रणालीच्या औद्योगिक उपाय योजनांसाठी महत्त्वपूर्ण टप्पा

# 'एक्सलॉजिया'सोबत शिवाजी विद्यापीठाचा करार

प्रतिनिधी,कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट आणि पुणे येथील एक्सलॉजिया टेक एलएलपी यांच्यामध्ये शनिवारी सामंजस्य करार करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाने विकसित केलेल्या आभासी वास्तविकता शैक्षणिक प्रणालीतील डिजिटल ॲसेट्स आणि क्विक रिस्पॉन्स आधारित बँकिंग प्रणालीचा वापर आणि वितरण यासाठी हा महत्त्वाचा टप्पा बनला असल्याचे प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा समाजोपयोगी वापर व्हावा, या दृष्टीने तिची सिद्धता होणे हा एक महत्त्वाचा प्रसंग आहे. त्याचा समाजाबरोबरच विद्यार्थ्यांनाही लाभ मिळवून देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी एक्सलॉजिया कंपनीचे शैलेश कोपर्डेकर यांनी विद्यापीठाने विकसित केलेले नवोपक्रम आणि तंत्रज्ञान प्रत्यक्ष उद्योग–व्यवसाय क्षेत्रापर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याची बाब लक्षात घेऊन या करारासाठी पुढाकार घेतला. या समाजोपयोगी विद्यापीठीय संशोधनाचा समाज आणि उद्योग क्षेत्राला प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी नजिकच्या काळात प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले.

यावेळी सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि कोपार्डेकर यांनी स्वाक्षरी केल्या. स्कूलचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सुधीर देसाई यांनी सामंजस्य कराराविषयी माहिती दिली. डॉ. वैशाली भोसले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, डॉ. परशुराम वडार, डॉ. तेजश्री मोहरेकर, डॉ. मनस्वी कोपार्डेकर व अभिजित जाधव उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात एक्सलॉजिया कंपनीसमवेत झालेल्या सामंजस्य कराराच्या प्रतींचे हस्तांतरण करताना प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि शैलेश कोपार्डेकर. बाजूस कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. नितीन माळी, डॉ. सुधीर देसाई आणि उपस्थित शिक्षक व कंपनीचे अधिकारी.

19 APR 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा एक्सलॉजिया कंपनीसमवेत सामंजस्य करार



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा समाजोपयोगी वापर व्हावा, या दृष्टीने तिची सिद्धता होणे हा एक महत्त्वाचा प्रसंग आहे. त्यांचा समाजाबरोबरच विद्यार्थ्यांनाही लाभ मिळवून देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट आणि पुणे येथील एक्सलॉजिया टेक एलएलपी यांच्यामध्ये विद्यापीठाने विकसित केलेल्या आभासी वास्तविकता (SUK-AR) शैक्षणिक प्रणालीतील डिजिटल ॲसेट्स आणि क्विक रिस्पॉन्स आधारित (QR based) बँकिंग प्रणालीचा वापर आणि वितरण यासाठी काल सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी एक्सलॉजिया कंपनीचे शैलेश कोपर्डेकर म्हणाले, विद्यापीठाने विकसित केलेले नवोपक्रम आणि तंत्रज्ञान प्रत्यक्ष उद्योग-व्यवसाय क्षेत्रापर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याची बाब लक्षात घेऊन या करारासाठी पुढाकार घेतला. या समाजोपयोगी विद्यापीठीय संशोधनाचा समाज आणि उद्योग क्षेत्राला प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी नजीकच्या काळात प्रयत्न करण्यात येतील.

यावेळी सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि श्री. कोपार्डेकर यांनी स्वाक्षरी केल्या. स्कूलचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. सुधीर देसाई यांनी सामंजस्य कराराविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. वैशाली भोसले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, डॉ. परशुराम वडार, डॉ. तेजश्री मोहरेकर, डॉ. मनस्वी कोपार्डेकर व अभिजित जाधव उपस्थित होते.